जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१०/०८/२०२३
## दि.०९/०८/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ४२४/२०२३,भादविक ३९२,३५२,४२७,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम,वय २७ वर्षे रा.विमाननगर, पुणे |
| **आरोपीत** | एकुण तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०९/०८/२०२३ रोजी रात्रौ ००/१५ वा.दत्तमंदीर चौकात पंचशील बिझनेस पार्क समोरील सार्वजनिक रोडवर,विमाननगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी हातगाडीवर काम करुन घरी जाणेसाठी निघाले असताना नमुद तीन इसम हे मोटारसायकलवरुन येवुन फिर्यादी यांना तु कोणाच्या सांगण्यावरून येथे हातगाडी लावतो, तुझी हातगाडी लगेच बंद करुन घे नाहीतर तुला दाखवतो मी कोण आहे, तु इथे कसा धंदा करतो तेच बघतो असे म्हणुन फिर्यादी यांना शिवीगाळ करुन मारण्याची धमकी देवुन हातगाडीवरील गल्ल्यातील रोख ३०००/- रु. जबरदस्तीने घेवुन येथील पार्क केलेल्या मोटारसायकलचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.व्ही.एम.चंदन मो. नं ८२७५५२२६९७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ५६१/२०२३,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | निवृत्ती मोरे,पोलीस अंमलदार नेमणुक चतु:श्रृंगी पोलीस ठाणे पुणे |
| **आरोपीत** | ट्रकवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०९/०८/२०२३ रोजी स.०६/३० वा.चे सुमा.मुलचंद स्वीटसमोर,सेनापती बापट रोडकडे जाणारे रस्त्यावर गणेशखिंड रोड पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार सत्यजीत जालिंदर निम्हण वय २८ वर्षे रा.श्रीकृष्णवाडी मोतीसेठ चाळ,दत्त मंदीराजवळ वडगाव शेरी यांस पाठीमागुन जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.सचिन गाडेकर मो.नं ९५५२३१५३१५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ६४५/२०२३,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय २९ वर्षे, रा. थेऊर रोड, केसनंद, पुणे |
| **आरोपीत** | अनोळखी मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०४/२०२३ ते १६/०५/२०२३ चे दरम्यान ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अनोळखी मोबाईल धारकाने फिर्यादी यांना टास्क जॉब वर्क फ्रर्म होम राहुन पैसे कमवता येतील असे व्हॉटसॲप व टेलीग्रामच्या माध्यमातुन संपर्क करून फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन फॉलो आणि लाईकचा टास्क, पुर्ण करायला लावुन ते मिळवण्या करीता,तसेच खाती व्हेरीफाय करायच्या नावाखाली वेगवेगळे चार्जेसचे पैसे पाठविण्यास सांगुन फिर्यादी यांची एकूण १६,७८,६००/-रु.ची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.राहुल कोळपे मो.नं.९६५७२६१०१० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ११६९/२०२३,भादविक ४२७,३२३,५०४,५०६,३४,महा.पो.का.क.३७ (१)१३५,आर्म ॲक्ट ४ (२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | एक महिला वय १९ वर्षे रा.हडपसर पुणे |
| **आरोपीत** | १.आकाश राजु गुजले,वय २२ वर्षे रा.त्रिमुर्ती गणपती मंदीराच्या मागे गंगानगर फुरसुंगी २. अभयसिग सिंकदरसिंग जुनी वय १९ वर्षे रा.गंगानगर सुखकर्ता कॉलनी,१५ नं गल्ली फुरुसुंगी हडपसर पुणे ३.पृथ्वीराज उर्फ साहिल संतोष आव्हाड, वय १९ वर्षे रा.सदर (अटक) एक विधीसंघर्षित बालक (ताब्यात) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.८/०८/२०२३ रोजी २२/०० वा.मोरया कॉलनी १६ नं लेन,गंगानगर,फुरसुंगी हडपसर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी ह्या राहते घरी असताना,नमुद इसमांनी जुन्या भांडणाचा राग मनामध्ये धरून, हातामध्ये लोखंडी रॉड घेवुन फिर्यादी यांचे पतीला शिवीगाळ,मारहाण करून त्यांचे घराच्या समोर पार्क केलेल्या गाडयावर लोखडी हत्याराने मारून नुकसान करुन धारदार शस्त्र हवेत फिरवुन आमच्याशी कोणी ंपंगा घ्यायचा नाही,नाहीतर जिवंत सोडणार नाही अशी धमकी देवुन येथुन निघुन गेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.महेश कवळे मो.नं ९६८९९५६९९९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**